# बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित,पुणे.

## वार्षिक अहवाल २०२६

## अध्यक्षीय मनोगत

सन्माननीय,

सभासद बंधू आणि भगिनींनो,

बोधिसत्व सहकारी रुग्णालय मर्यादित पुणे चा आर्थिक वर्ष २०२५-२६ कालावधीचा पाचवा वार्षिक अहवाल आपल्यासमोर सादर करीत आहे.

संस्थेच्या स्थापनेपासून आरोग्य क्षेत्रात सभासदांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राहिला आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र आता पुणे जिल्हा करण्यात आले आहे. तथापि, सध्या पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात संस्थेचे कार्य सुरू आहे. संस्थेचे जानेवारी २०२२ पासून पुणे इंटरनॅशनल स्कूल, विद्यानगर येथे ओपीडीची सुरुवात करण्यात आली परंतु सभासदांकडून आणि परिसरातील लोकांकडून अपेक्षित प्रतिसाद दिसून येत नाही. संस्थेने भाडेतत्त्वावर इमारत घेऊन संस्थेचे दापोडी मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल जून २०२४ पासून सुरू केले असून ३० बेड सह सर्व सोयी सुविधा युक्त उपलब्ध करून दिले आहे. परंतु खेदाने नमूद करावे वाटते की सभासदांचा या रुग्णालयातून आरोग्य सेवा घेण्याचा सहभाग नगण्य आहे, उलट सदर दापोडी रुग्णालयाची सेवा फक्त बिगर सभासदांनीच लाभ घेतला असल्याचे दिसून येते.

संस्थेच्या स्वतःच्या इमारतीमध्ये रुग्णालय उभे करण्याचे प्रयत्न संचालक मंडळ करत आहे. वेळोवेळी जागेसाठी प्रस्ताव शासकीय विभागाकडे तसेच पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे सादर करण्यात आले. परंतु जागा संपादित करण्यास अजूनही यश मिळाले नाही. येरवडा येथील जवळपास ६४०० वर्ग फूटा चे सर्वे नं १९१/अ मधील भूखंडासाठी संस्थेने म्हाडाच्या निविदेत भाग घेतला आणि निविदा प्रक्रियेत संस्थेची सर्वोच्च बोली १ ऑगस्ट २०२४ ला निविदा मंजूर करण्याचे म्हाडाने जाहीर केले. रीतसर भूखंड आवंटनासाठी पत्रव्यवहार केला पण जवळपास दीड वर्षानंतर सदर भूखंड येरवडा क्षेत्रात क्लस्टर प्रस्तावित असल्यामुळे निविदा रद्द करण्यात येत असल्याचे पत्र दिनांक १६.१२.२०२५ म्हाडा कडून प्राप्त झाले.

यासंबंधी आरटीआय अंतर्गत माहिती मागविण्यात आली आणि मिळालेल्या माहितीवरून असा निष्कर्ष काढण्यात येतो की म्हाडांनी हेतू पुरस्कर निविदा रद्द केली आहे. सदर भूखंडासाठी बोधिसत्व

रुग्णालयाने सर्वोच्च बोली रक्कम दिली होती. पुणे महानगरपालिकेच्या सर्वे नंबर १९१ येरवडा चा विकास आराखडा सन २००७-२०२७ मंजूर असून सदर भूखंड ॲमेनीटी स्पेस म्हणून मंजुरी आहे. दिनांक १७.१२.२०२५ चे ई-मेल मध्ये भूखंडाची रक्कम रु. ३,६८,४०,९९३/- फायनान्शियल इव्हॅल्युएशन मध्ये चुकीचे दर्शविली आहे वस्तूतः आपण रु. २,१८,५४,८२६/- ची निविदा भरली होती व दिनांक ०२.८.२०२४ चे म्हाडाचे टिपणीवरून फायनान्शिअल बीड इव्हॅल्युएशन मधे सदर निविदा सर्वोच्च होती. तसेच ०२.०८.२०२४ टिपणीला माननीय उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी २६.०९.२०२४ रोजी मान्यता दिल्याचे दिसून येते. याच सर्वे नंबर मध्ये म्हाडा ने सविता नायक यांना दिनांक २८.१०.२०२५ व दयासागर सहकारी गृह निर्माण संस्थेस २२.०५.२०२५ रोजी लीज डिड करून दिले आहे. हे दोन भूखंड याच सर्वे नंबर मधील असून ते वगळून क्लस्टर डेव्हलपमेंट कसे होऊ शकते? म्हाडाचा दिनांक १६.१२.२०२५ चा आपल्या भूखंडाची निविदा रद्द करण्याचा निर्णय म्हाडा (डिस्पोजल ऑफ लँड) रुल्स १९८१ व (डिस्पोजल ऑफ लँड) रेगुलेशन १९८२ चे तरतुदीचे उल्लंघन करणारे आहे. तसेच महाराष्ट्र रिजनल अँड टाऊन प्लॅनिंग ऍक्ट चे कलम ३७ चे उल्लंघन करणारे आहे. दिनांक 16. 12 .2025 चे पत्र नैसर्गिक न्याय तत्वाचे उल्लंघन करणारे आहे. व म्हाडाचे ध्येय धोरणाशी ही विसंगत आहे. त्या अनुषंगाने माननीय उच्च न्यायालयात दाद मागण्याचे संचालक मंडळाच्या बैठकीत ठरविण्यात आले आहे आणि त्यासाठी रीतसर रिट पिटिशन सादर करण्यात आली आहे.

आरोग्य क्षेत्रात लोकांना परवडणाऱ्या दरात आरोग्य सेवा देण्याचा आपला उद्देश आहे आणि या उपक्रमाला सभासदांचा सहभाग आणि योगदान अपेक्षित आहे.

आर्थिक वर्ष १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ अखेर संस्थेने केलेल्या प्रगतीची तसेच आर्थिक परिस्थितीची आणि भविष्यातील वाटचाल इत्यादींची माहिती आपल्यासमोर सादर करीत आहे.

## १.सभासदः-

३१ मार्च २०२५ अखेर संस्थेचे १९७१ एकूण सभासद आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ असून सभासदांनी घेतलेल्या भागांची संख्या खालील प्रमाणे आहे.

| सभासदांनी घेतलेल्या भागाची संख्या | एकूण सभासद | पैकी २०२५-२६ मध्ये झालेल्या नवीन सभासद |
|---|---|---|
| एक | ११४२ | ३६ |
| दोन | ३७२ | ११ |
| तीन | २४ | ० |
| चार | ४४२ | २ |

| | | |
|---|---|---|
| पाच आणि पाच पेक्षा जास्त | ४० | ० |
| एकूण | २०२० | ४९ |

संस्थेच्या नोंदणी नंतर ते 31 मार्च 2026 पर्यंत नवीन सभासद होण्याचा प्रवास अत्यंत निराशात्मक आहे.

नवीन सभासद होण्याची प्रक्रिया अतिशय संथ गतीने होत आहे. संस्थेच्या अधी मंडळाच्या दिनांक २२ सप्टेंबर २०२४ रोजी संपन्न झालेल्या वार्षिक सभेत ठराव क्रमांक ३ नुसार प्रत्येक सभासदांनी एक नवीन सभासद करावा, एक नवीन शेअर्स घ्यावा व वार्षिक वर्गणी रुपये २०००/-भरावी, असा ठराव पारित करण्यात आला होता परंतु आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये या ठरावाची अंमलबजावणी झाली नाही.

संस्थेचे स्वतःचे रुग्णालय उभे करण्यासाठी आर्थिक पाठबळ आवश्यक आहे. आणि त्यात प्रत्येक सभासदाने एक नवीन सभासद जोडणे, किमान एक वाढीव शेअर्स घेणे व वार्षिक वर्गणी रुपये २०००/- प्रति वर्ष भरणे महत्त्वाचे आहे. निधी गोळा करण्यासाठी सभासदांनी सर्वोत्तपरी योगदान आणि सहकार्य करावे ही विनंती.

## 2. भागभांडवल :-

संस्थेचे अधिकृत भाग भांडवल रु.५,००,००,०००/-(पाच कोटी) असून प्रत्येक शेअरची किंमत रु ५,०००/- आहे. ३१ मार्च २०२६ रोजी संस्थेचे वसूल भाग भांडवल रु.१,९९,०५,०००/-आहे.

संस्थेचा निधी गोळा करण्यात भाग भांडवल हे एक महत्त्वाचे स्त्रोत्र आहे.२२ सप्टेंबर २०२४ च्या वार्षिक सभेच्या ठरावानुसार प्रत्येक सभासदांनी अधिकचा एक शेर घ्यावा तसेच एक नवीन सभासद करून घ्यावा व वार्षिक वर्गणी भरणा करणे, दान द्यावे असे ठरविण्यात आले होते परंतु सभासदांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही त्यामुळे भाग भांडवल वृद्धी झाली नाही.

संस्थेची भाग भांडवल गोळा करण्याची प्रगती नगण्य असल्याचे दिसून येते. भाग भांडवलात वाढ सभासदांनी एका पेक्षा अधिक शेअर घेतल्यास होऊ शकते. नवीन सभासद करून घेतल्यास होऊ शकते. सर्व सभासदांना आवाहन करण्यात येते की ज्यांनी एक शेअर घेतला आहे. त्यांनी अधिकचा एक शेअर घेऊन एक नवीन सभासद जोडून व वार्षिक वर्गणी नियमितपणे भरणा केल्यास भाग भांडवल वृद्धी होऊ शकते व संस्थेचे स्व बळावरील रुग्णालय स्थापनेचे स्वप्न पूर्ण होऊ शकते. भाग भांडवल गोळा करण्यासप्रत्येक सभासदाने सहकार्य व प्रयत्न करावे.

## ३. वार्षिक वर्गणी:-

संस्थेच्या उपविधी क्रमांक ७अ नुसार प्रत्येक सभासदांनी वार्षिक वर्गणी रु.२०००/-देणे आवश्यक आहे. सभासदांकडून प्राप्त झालेली वार्षिक वर्गणीची स्थिती खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | सभासदांची संख्या | देय वार्षिक वर्गणी | मिळालेली वार्षिक वर्गणी सभासद राशी |
|---|---|---|---|
| २०२१-२३ | १७७८ | ३५,५६,०००/- | ० |
| २०२३-२४ | १८३९ | ३६,७८,०००/- | ७,०००/- |
| २०२४-२५ | १९७१ | ३९,४२,०००/- | १,४७,०००/- |
| २०२५-२६ | २०२० | ४०,४०,०००/- | ४,७९,०००/- |
| | एकूण | १,५२,१६,०००/- | ६,३३,०००/- |

याचाच अर्थ रुपये १,४५,८३,०००/-वार्षिक वर्गणी थकीत आहे. वार्षिक वर्गणीच्या माध्यमातून संस्थेला लागणारा निधी गोळा करता येईल वार्षिक वर्गणीसाठी सभासदांना संस्थेच्या व्हाट्सअप ग्रुप वर तसेच वैयक्तिक रित्या पत्र पाठवण्यात येत आहे. सर्व सभासदांना आग्रहाची विनंती आहे की,देय असलेल्या चालू व थकीत वर्गणीची रक्कम संस्थेकडे जमा करावी.

## ४. आरोग्य शिबिर

आर्थिक वर्ष २०२५-२६ या वर्षात संस्थेने ४ आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे आणि त्यात ३७८ लोकांनी सहभाग घेतला आहे. सीओईपी मध्ये एक शिबिर आयोजित केले होते त्यातून रक्कम रुपये २०,१७८/- प्राप्त झाले.

## ४. संचालक मंडळ आणि संचालक मंडळाच्या बैठका :-

नवनिर्वाचीत संचालक मंडळ २०२५-२०३० पर्यंतच्या कालावधीसाठी ९ जुलै २०२५ पासून कार्यरत असून विभिन्न क्षेत्रातील अनुभवी सदस्यांचे संचालक मंडळ दैनंदिन व्यवहार आणि कामकाज करीत आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये संचालक मंडळाच्या एकूण ८ बैठका घेण्यात आल्या.

## ५. संस्थेची आर्थिक स्थिती :-

३१ मार्च २०२६ अखेर सस्थेचे वैधानिक लेखापरीक्षण मे. माधव बो-हाडे आणि कंपनी यांनी केले आहे. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या वर्षा चे नफा-तोटा पत्रक तसेच ३१ मार्च २०२६ चे ताळेबंद सोबत जोडलेले आहेत. वरील पत्रकावरून संस्थेची आर्थिक परिस्थिती खालील प्रमाणे दिसून येते.

- संस्थेचे एकूण वसूल भागभांडवल रु.१,९९,०५,०००/-आहे.

- वैधानिक लेखापरीक्षकांच्या रिपोर्टनुसार संस्थेला ३१ मार्च २०२६ ला संपलेल्या कालावधीत एकूण नफा रु.७,९९,६३०/- झालेला आहे. माननीय संचालकांच्या रु.१९,९५,०००/- आर्थिक योगदानामुळे हा नफा दिसून येतो.
- संस्थेचा ३१ मार्च २०२५ रोजी चा एकूण संचित तोटा रु. १९,२६,०२५.०५/- होता. या वर्षी झालेला नफा रुपये रु.७,९९,६३०/-आहे. यामुळे संस्थास ३१ मार्च २६ अखेर संचित तोटा रुपये ११,२६,३९६/-एवढा आहे. सभासदांनी एक नवीन सभासद जोडला असता तर हा तोटा झाला नसता.
- संस्थेच्या निधीचा उपयोग गरजेनुसार करण्यात येत आहे. व शिल्लक निधीची बँकेत मुदत ती ठेवीत करण्यात येत आहे.३१ मार्च २०२६ रोजी विभिन्न बँकेत असलेल्या ठेवीतील गुंतवणूक खालील प्रमाणे आहे.

## १.मुदत ठेव :

| बँकेचे नाव | मुदत ठेव |
|---|---|
| पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | २८,५१,३९२.०० |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | २९,३३,९९६.०० |
| इंडियन बँक | २५,००,०००.०० |
| एचडीएफसी बँक | ३१,२५,१६९.२० |
| येस बँक | ३३,०८,५०२.९० |
| एकूण | १,४७,१९,०६०.१० |

## २. चालू खाते

| बँकेचे नाव | चालू खाते |
|---|---|
| पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | ३,३९,२११.७८ |
| स्टेट बँक ऑफ इंडिया | १,३२,९८१.९१ |
| इंडियन बँक | ३४,४७९.१५ |
| एचडीएफसी बँक | ५,८९,४८०.८९ |
| येस बँक | ३,४८,१८१.०५ |
| एकूण | १३,४५,३३४.७८ |

- आर्थिक वर्ष २०२५-२६ या वर्षात वेगवेगळ्या दानशूर व्यक्तीकडून रु. ९१,००० /- दान प्राप्त झाले.
- वार्षिक वर्गणी रु.४,७९,०००/-प्राप्त झाली आहे

दापोडी हॉस्पिटल चालविण्यासाठी संस्थेच्या निधीतून खर्च न करता संचालकांचे आर्थिक योगदानातून रुग्णालय चालविण्याचा प्रयत्न केला आहे.

धम्मदाना करिता दानकर्त्यांचे संचालक मंडळाकडून अभिनंदन करण्यात येत आहे. सर्व सन्माननीय सभासद आणि हितचिंतकांना विनंती करण्यात येते की, संस्थेच्या उद्देश पूर्तीसाठी जास्तीत जास्त धम्मदान देऊन उपकृत करावे.

## ७.संस्थेची पुढची वाटचाल:-

सहकारी क्षेत्रात स्वतःचे सुसज्ज रुग्णालय असावी या दृष्टिकोनातून संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. स्वतःची जागा घेऊन त्यावर सुसज्ज रुग्णालय उभे करण्याचा मानस आहे. त्यासाठी पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे जागेसाठी प्रस्ताव सादर केला आहे. परंतु अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. संस्था मागील अधिमंडळाच्या वार्षिक सभेत झालेल्या ठरावानुसार खाजगी जागा खरेदी करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत पण जागेच्या अवाढव्य किमती आणि संस्थेकडे अपेक्षित निधी उपलब्ध नसल्यामुळे खाजगी जागा घेण्यासाठी विचार करता आला नाही.

दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी म्हाडाच्या बैठकीत येरवडा येथील भूखंड १९१/अ येरवडा प्लॉट नंबर १६ क्षेत्रफळ ५९५ चौरस मीटर साठी भरलेली निविदा मंजूर करण्यात आली होती. म्हाडा कडून भूखंड आवंटनाचे पत्र मिळवण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. १६ डिसेंबर २०२५ रोजीच्या पत्राद्वारे सदर भूखंड येरवड्यातील क्षेत्राचे क्लस्टर डेव्हलपमेंट करण्यात येत असल्याचे कारणमुळे निविदा रद्द करण्यात येत असल्याचे उत्तर मिळाले.

संचालक मंडळाच्या आरटीआय च्या अंतर्गत सदर भूखंडासंबंधी निविदा रद्द करण्याचे कारण व संबंधित कागदपत्रांची माहिती मागितली होती. म्हाडा कडून आरटीआय अंतर्गत माहिती न मिळाल्याने अपील करण्यात आले. निविदा रद्द करण्यासंबंधीचे कागदपत्र प्राप्त मिळालेनंतर माहितीचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की म्हाडा हेतू पुरस्कर निविदा रद्द करीत आहे. संचालक मंडळाच्या बैठकीत विस्तृत चर्चे अंती असा निर्णय घेण्यात आला की, यासंबंधी मा. उच्च न्यायालयात दाद मागण्यात यावी. यासाठी लागणारी वकील फीस देण्याकरिता माननीय संचालकाने आर्थिक योगदान द्यावे व फीस खर्च करावा. संचालकांच्या आर्थिक योगदानातून प्राप्त रकमेच्या व्यतिरिक्त वकील फीस खर्चा करिता लागणारी रक्कम संस्थेच्या निधीतून करणार आहोत. म्हाडा भूखंडासाठी रु.२,१८,५४,८२६/-एवढी रक्कम

त्यासाठी अनुषंगीक स्टॅम्प ड्युटी व इतर खर्च गृहीत धरता रु.२,७५,००,०००/-लागणार आहे संस्थेत ठेवी स्वरूपात रु.१,४७,००,०००/-फक्त उपलब्ध आहे. त्यामुळे या भूखंडाचे आवंटन झाले तर रु.२,७५,००,०००/-संस्थेत नाही त्यामुळे किमान १,२५,००,०००/-तातडीने उभारणे गरजेचे आहे. सदर रक्कम न उभारल्यास म्हाडा भूखंड मिळणे पासून संस्था वंचित राहील अशी नामुष्की येऊ नये. यासाठी भाग भांडवल, वर्गणी, दान प्रत्येक सभासदाने उभारणेस अहर्निष प्रयत्न करावे.

संचालक मंडळांनी संबंधित प्रकल्पात लक्ष घालून भूखंडाचे आवंटन करण्यासाठी राज्याचे माननीय मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच स्थानिक खासदार यांना पत्र लिहिले आहे .मा. उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण निर्माण मंत्री यांनी हे निवेदन उचित कार्यवाहीसाठी सचिव गृहनिर्माण यांना अग्रेषीत केले आहे.

मा. उच्च न्यायालयात दाद मागण्यासाठी वकिलाचा खर्च, रिट पिटीशन फाईल करण्याचा खर्च, स्टेशनरी व अन्य संबंधित खर्च करण्यासाठी संस्थेच्या निधीतून खर्च होऊ शकतो.

स्वतःचे हॉस्पिटल होईपर्यंत आरोग्य सेवा सभासदांसाठी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दापोडी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यात आले आहे.

बोधिसत्व सहकारी रुग्णालयाचे दापोडी मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल ३ जून २०२४ पासून दापोडी येथे कार्यरत आहे. सदर हॉस्पिटल ३० बेडचे असून रुग्णालयात आयसीयू, ऑपरेशन थिएटर इत्यादी ची व्यवस्था उपलब्ध आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये संस्था डॉक्टर आणि आवश्यक स्टाफ नेमून हॉस्पिटल चालवीत होते परंतु त्यात उत्पन्नापेक्षा खर्च जास्त होत होता आणि त्यामुळे संस्थेला तोटा होत. सप्टेंबर २०२५ मध्ये स्टार एशिया वर्ल्ड च्या मॅनेजमेंटला हॉस्पिटल चालविण्यासाठी देण्यात आले आहे. १ फेब्रुवारी २०२६ पासून सदर रुग्णालय बोधिसत्व सहकारी रुग्णालयाच्या बॅनरखाली चालविण्यासाठी डॉक्टर राहुल भांबुर्डे व डॉक्टर नयन लोंढे यांचे स्टार एशिया वर्ड या कंपनी सोबत रितसर करारावर देण्यात आले. त्यासाठी हॉस्पिटलचे भाडे आणि रु.५०,०००/-प्रतिमाह रेमुनरेशन मिळत आहे. भविष्यात प्रतिमाह रेमुनरेशन दर वाढविण्याचे करारात ठरविण्याची प्रावधान आहे. संस्थेच्या सभासदांना उपविधीतील तरतुदीप्रमाणे २०% सवलत मिळेलच सर्व सभासदांना विनंती आहे की सदर रुग्णालयातून आरोग्य सेवेचा लाभ घ्यावा.

## ८. शेअर सर्टिफिकेटचे वाटप:-

सन्माननीय सभासदांनी घेतलेल्या शेअर्सचे शेअर सर्टिफिकेट तयार करण्यात आले आहे. अजूनही काही सभासदांनी त्यांचे शेअर सर्टिफिकेट घेतले नाही. सभासदांना विनंती करण्यात येते की संस्थेच्या कार्यालयातून शेअर सर्टिफिकेट घेण्यात यावे.

## ९. वैधानिक लेखापरीक्षण:-

आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या कालावधीचे वैधानिक लेखापरीक्षण में माधव बो-हाडे आणि कंपनी यानी केले असून लेखापरीक्षण अहवाल संस्थेत सादर केला आहे. मा. लेखापरीक्षक यानी संस्थेस **ब** वर्ग दिला आहे. मी संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने त्याचे आभार व्यक्त करतो.

## १०. आभार:-

संस्थेच्या वतीने मा. आयुक्त सहकार, महाराष्ट्र राज्य, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, श्री नागनाथ कंजिरे, उपनिबंधक तथा निवडणूक प्राधिकरण अधिकारी यांचे आभार मानतो. निधी गोळा करण्यासाठी सर्व स्तरातील व्यक्तींनी, विभिन्न विभागातील व्यक्तींचे मोलाचे योगदान दिले आहे. सन्माननीय सभासदांचे संस्थेच्या हितचिंतकांचे मी संचालक मंडळाच्या वतीने अभिनंदन करतो आणि आभार मानतो. "संथेचे संचालक डॉक्टर आनंद जोगदंड यांनी भागभांडवल, वार्षिक वर्गणी, धम्म दान,व ठेव स्वरूपात एकूण संस्थे चे जमा निधी पैकी वीस टक्के पेक्षा जास्त निधी, रू.४१,११,२१८/- जमा करून भरीव आर्थिक योगदान दिले आहे.त्यांचे संचालक मंडळ व सभासदांचे वतीने मनःपुर्वक हार्दिक अभिनंदन व आभार, प्रत्येक सभासदाने डॉक्टर जोगदंड यांचे निधी जमा करणेबाबत अनुकरण करावे हीच विनंती." पुढच्या वाटचालीसाठी सर्वांचे योगदान आणि सहकार्याची अपेक्षा करतो. भविष्यकाळात सहकारी रुग्णालय लोकांच्या आरोग्य गरजा पूर्ण करण्यासाठी शाश्वत संस्था म्हणून नावलौकिक प्राप्त करण्यासाठी शुभेच्छा देतो

## ११. श्रद्धांजली :-

अहवाल कालावधीत निधन पावलेले संस्थेचे सभासद त्यांचे कुटुंबातील व्यक्ती तसेच संस्थेचे हितचिंतक, ज्ञान व अज्ञात व्यक्ती या सर्वांच्या व कुटुंबाच्या दुःखात संस्था सहभागी होत असून संस्थेच्या वतीने मृत सभासदांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.

आपला.

डॉ. मोरेश्वर सुखदेवे

अध्यक्ष